# आरे वसाहतीत मेट्रो कारशेडचा मार्ग मोकळा

## ४०७ एकर जमीन इकोसेन्सिटिव्ह झोनमध्ये नसल्याचा न्यायालयाचा निकाल

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. २१ : मुंबईचा हरित पट्टा आणि वनक्षेत्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आरे वसाहतीमधील तब्बल ४०७ एकर जमीन इकोसेन्सिटीव झोनमध्ये येत नसल्याचा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. यामुळे आता या क्षेत्रात मेट्रो कारशेडसह अन्य पायाभूत सुविधा उपलब्ध करण्याची मुभा केंद्र आणि राज्य सरकारला मिळाली आहे.



### लवादाचा निर्णय कायम

वनशक्ती संस्थेने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. मात्र लवादाने दिलेल्या निर्णयामध्ये हस्तक्षेप करण्यासारखे काही नाही, असे निरीक्षण न्या. अरुण मिश्रा आणि न्या. अब्दुल नाझीर यांच्या खंडपीठाने नोंदविले आणि लवादाचा निकाल कायम ठेवला.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामधील संबंधित विभाग वनक्षेत्रात येतो, त्यामुळे तेथे कोणत्याही बांधकामाला परवानगी देऊ नये, अशी मागणी करणारी जनहित याचिका वनशक्ती पर्यावरण प्रेमी संस्थेने दाखल केली होती. ही याचिका राष्ट्रीय हरित लवादाच्या जानेवारीच्या निर्णयाविरोधात करण्यात आली होती. मात्र ही याचिका नामंजूर करण्यात आली आहे.

केंद्र सरकारने डिसेंबर २०१६ मध्ये वनक्षेत्राचा संबंधित भाग पायाभूत सुविधा उभारण्यासाठी ताब्यात घेण्याबाबत अधिसूचना जारी केली होती. केंद्र सरकारच्या सूचनेनुसार, मेट्रो रेल्वे प्रकल्प,

पान ७ वर